# निर्भय कन्या अभियान कार्यशाळा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.व नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय,सिन्नर.यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी एकदिवसीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली. हि कार्यशाळा सकाळी १०.०० वाजता उद्घाटन समारंभाने सुरु करण्यात आले. तसेच या कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आले. निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.महेश शिंदे यांनी केले.कार्यशाळेस उपास्तित प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रा.वर्षा गरगटे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यशाळा समन्वयक प्रा.धनश्री गांगुर्डे याने केले. या कार्यशाळे साठी उपस्थित असलेले मा.शिवराज सोनवणे (प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था) यांनी त्याचे मनोगत व्यक्त केले.

या निर्भय कन्या कार्यशाळेस लाभलेले पहिले प्रमुख पाहुणे मा.संजय वाघमारे (पोलीस उपनिरीक्षक,सिन्नर पोलीस ठाणे) यांनी प्रथम सत्रामध्ये **pocso** या कायदयाबद्दल मुलींमध्ये जनजागृती घडवून आणले.या सत्रामध्ये त्यांनी किशोरवयीन अवस्थेतील आकर्षण, मोबेईलचे दुष्परिणाम, व्यसनाधीनता, सायबर थॉट, महिला विरोधी गुन्हेगारी व त्या सबंधित कायदे यांची माहिती मुलीना करून दिली. या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तराच्या सत्रामध्ये मुलीनी उत्साहीपणे भाग घेतला व मुलींच्या विविध प्रश्नांना पोलीस उपनिरीक्षक मा. संजय वाघमारे यांनी समाधानकारक उत्तरे दिले. याच्या समवेत श्री.अंकुश दराडे (पोलीस शिपाई सिन्नर पोलीस ठाणे) उपस्थित होते.

अल्पोहारानंतर दुसऱ्या सतरची सुरुवात १२.३० नंतर सुरु करण्यत आला.या सत्रामध्ये सारिका पालवे व सुशांत मेंगाळ या विद्यार्थ्यांनी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षणा अंतर्गत तायक्वादो च्या तंत्र शिकवल्या ज्या

रोजच्या जीवनात मुलींना अथक परीस्थितीतून वाचण्यासाठी मदत करतील व मुल्लींच्या स्वसंरक्षण जनजागृतीसाठी प्रयत्न करतील.

तिसऱ्या सत्रामध्ये प्रमुख अथिती म्हणून लाभलेल्या मा.सौ. गिताताई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले व "आम्ही लेकी अहिल्येच्या" या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थीनीना त्यांनी व त्यांच्या समवेत विना कानकाटे, ज्योती गुजराती, वैशाली वैद्य या प्रशिक्षकांनी लाठीकाठी व कराटे चे प्रशिक्षण दिले. या सर्व प्रशिक्षकानी विद्यार्थिनींना निशस्त्र तसेच शस्त्रनिहाय प्रशिक्षण देऊन स्वसंरक्षणाचे धडे दिले. यानंतर मनोरंजनासाठी व शारीरिक चपळाई वाढविण्यासाठी विविध खेळ घेतले व मुलींना मोलाचे ज्ञान प्रदान केले. प्रा. राजश्री बागुल यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.